**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २१ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

1. **सरकार आणि जनतेतली दरी कमी करण्याचं काम नागरी सेवेतल्या अधिकाऱ्यांनी करावं, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आवाहन.**
2. **वक्फ कायदा हा कुठल्याही धर्माच्या विरोधात नाही - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची नागपुरात स्पष्टोक्ती.**
3. **राज्याचे मुख्य माहिती आयुक्त म्हणून राहुल पांडे यांचा शपथविधी.**
4. **नागपूरसह विदर्भाच्या अनेक जिल्ह्यात उद्या आणि परवा उष्णतेच्या लाटेचा इशारा.**

---------------------------------------

**नागरी सेवा दिन**

**सरकार आणि जनतेतली दरी कमी करण्याचं काम नागरी सेवेतल्या अधिकाऱ्यांना करायचं आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. १७ व्या नागरी सेवा दिनानिमित्त दिल्लीत विज्ञान भवन इथं आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. केवळ नशिबाच्या जोरावर, कष्ट न करता यश मिळत नसतं, बदलत्या काळाचा वेग लक्षात घेऊन तंत्रज्ञानाच्या आधारे विकासाच्या संधी निर्माण केल्या पाहिजेत असं ते म्हणाले. २०१४ पासून व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्या साठी प्रयत्न झाल्याचे ते म्हणाले-**

***2014 के बाद से देश में व्यवस्था परिवर्तन का एक बहुत बड़ा महायज्ञ शुरू हुआ है। हम इस तेज स्पीड के साथ खुद को तेजी से ढाल रहे हैं। आज भारत की एस्पिरेशनल सोसायटी, भारत के युवा, भारत के किसान, भारत की महिलाएं उनके सपनों की उड़ान आज जीस उचाई पर है वो वाकई अभूतपूर्व है।***

**पीडित आणि वंचितांप्रति सहानुभूतीचा दृष्टिकोन ठेवून सर्वांना सामावून घेणारा विकास घडवावा असा सल्ला त्यांनी नागरी सेवा अधिकाऱ्यांना दिला. प्रशासनातल्या उत्कृष्ट कामगिरीसाठीचे प्रधानमंत्री उत्कृष्ट प्रशासन पुरस्कार यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते १६ अधिकाऱ्यांना देण्यात आले. होलिस्टिक डेवलपमेंट ऑफ डिस्ट्रिक्ट, आकांक्षित खंड विकास कार्यक्रम आणि**

नवोन्मेष अशा तीन विभागात मिळून १ हजार ५८८ प्रवेशिकांमधून  हे १६ पुरस्कार देण्यात आले.स्मृतीचिन्ह, मानपत्र, आणि २० लाख रुपयांचं रोख पारितोषिक असं पुरस्कारांचं स्वरूप आहे.

---------------------------------------

रामदास आठवले

वक्फ कायदा हा कुठल्याही धर्माच्या विरोधात नाही परंतु सुप्रीम कोर्टाने संसदेपेक्षा सुप्रीम होऊ नये. संसदेने पारित केलेल्या कायद्यावर रिट पिटीशन करणे योग्य आहे. परंतु संसदेत ही विधेयक बहुमताने कायद्याच्या चौकटीत राहून संमत केलेली  असतात. भारतीय संविधानाने सुद्धा भारतीय संसद हि सर्वोच्च आहे असे सांगितले आहे असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज नागपुरात पत्रकार परिषदेत केलं. महाबोधी कायद्याच्या अन्वये महाबोधी ट्रस्ट मध्ये चार  बौद्ध  आणि चार हिंदू सदस्य असावे असा कायदा आहे परंतु यामधील आठही सदस्य  बौद्ध  असावेत अशी मागणी महाराष्ट्रातून तसेच देशातून जोर धरत आहे. या मागणीसाठी आपण बिहारचे मुख्यमंत्री नितीश  कुमार यांना भेटलो  असून लवकरच आपण हा विषय पंतप्रधानांकडे  मांडण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आठवले यांनी स्पष्ट केलं.याप्रसंगी  केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारीता विभाग आणि दिव्यांग कल्याण विभागाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या योजनांची नागपूर विभागातील सर्व जिल्हयांमध्ये तसाच  नागपूर जिल्हयातील अंमलबजावणीबाबतचा त्यांनी आढावा घेतला. त्यांनी नागपूर विभागातील दाखल झालेल्या अॅट्रॉसिटी केसेसबद्दल माहिती दिली.

*अॅट्रॉसिटीसिटी अॅक्टचा आपण आढावा घेतला आणि अॅट्रॉसिटी अॅक्ट 1989 कायदा पारित केला होता त्या नंतर जवळजवळ 1989 ते 2025 या काळामध्ये जवळजवळ 36 वर्षांच्या काळामध्ये 8432 एवढ्या अॅट्रॉसिटी या नागपूर डिव्हिजन मध्ये झालेले आहे आणि त्याच्या मधल्या 1992 केसेस ज्या आहेत त्या पेंडिंग आहेत.*

हिंदी या राष्ट्रभाषेचा विरोध करणे योग्य नाही महाराष्ट्रात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मुंबईत मराठीच्या सक्तीच्या केलेल्या दादागिरीला राज्य शासनाने चाप बसवणे आवश्यक आहे असे देखील त्यांनी सांगितलं.

---------------------------------------

पोषण आहार

पोषण आहार पंधरवड्यानिमित्त यवतमाळ जिल्ह्यात विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. प्रकल्प अधिकारी विशाल जाधव यांनी सांगितलं..

*प्रत्येक अंगणवाडी केंद्रावर विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित केली जातात. त्यामध्ये गृहभेटी असतील किंवा लाभार्थी जसे आपले लहान बालक आहे, स्तनदा माता, गरोदर माता यांच्या घरी जाऊन त्यांच्यासोबत सुसंवाद साधला जात आहे आणि पोषण अभियानांतर्गत कुपोषण कशा पद्धतीने कमी करणे आणि बालके आणि मातांचा सुपोषण कसं करायचं आहे त्याबद्दल त्यांना मार्गदर्शन केले जात आहे.*

----------------------------------------

मुख्य माहिती आयुक्त

महाराष्ट्र राज्याच्या मुख्य माहिती आयुक्तपदी नागपूरचे ज्येष्ठ पत्रकार राहुल पांडे यांची नियुक्ती झाली आहे. राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी त्यांना पदाची शपथ दिली. त्यांच्यासोबत नागपूरचेच रवींद्र ठाकरे, गजानन निमदेव आणि प्रकाश इंदलकर, यांना राज्य माहिती आयुक्तपदाची शपथ देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थतीत मुंबईत राजभवन इथं हा शपथविधी झाला. या सोहळ्याला मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा माहिती आणि जनसंपर्क महासंचालक ब्रिजेश सिंह, विधान परिषद सदस्य परिणय फुके, पत्रकार तसंच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

----------------------------------------

सभापती राम शिंदे

देशाच्या लोकसंख्येनुसार मतदार संघाच्या परिसमनानुसार जर विधानसभेत सुद्धा सदस्य संख्या वाढली तर त्या अनुषंगाने नागपुरातील विधान भवन येथे नवीन विधानसभा, विधान परिषद, प्रशासकीय भवन असा परिपूर्ण प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाला तयार करण्याचे निर्देश दिले असल्याची माहिती आज विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी नागपुरात दिली. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे आणि विधानसभेचे अध्यक्ष अड राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन परिसरातील विविध सोयी सुविधा याबाबत आज आढावा घेतल्यानंतर पत्रकार परिषदेत ते आज बोलत होते. हे बांधकाम होताना मूळ हेरिटेज बिल्डिंगला कुठलाही धक्का लावण्यात येणार नाही अस देखील शिंदे यांनी स्पष्ट केल. बहुमजली बिल्डिंग आमदार निवासात बांधण्याचे देखील निर्देश या बैठकीत देण्यात आले आहे असं त्यांनी

सांगितलं.  नागपुरात दरवर्षी होणाऱ्या हिवाळी अधिवेशनाच्या निमित्तान ज्या वास्तु देखभालिकरीता खर्च करण्यात येतो त्याऐवजी संपूर्ण वर्षभर ह्या वास्तूंचा उपयोग कसा होईल याबद्दल  राम शिंदे यांनी या पत्रकार परिषदेत सांगितल.

*त्यामुळे एक महिन्यासाठी आपण एवढा मोठा खर्च करतो त्यापेक्षा मेन्टेनन्स केले आहेत आणि आता आपण पाहिलं असेल की आमदार निवासमधे काही ठिकाणी रूम देतो आपण  रेस्टॉरंट वापरण्यासाठी देतो अशा पद्धतीचे काही करता येतं, शेवटी हे सस्टेन  झालं पाहिजे  मेंटेनेन्स झाल पाहिजे शेवटी एक महिन्यासाठी 200 कोटी रुपये खर्च करायचा आणि बाराही महिने जर चालवण्यासाठी ५० लाख रुपयेमध्ये जर मेंटेनन्स होत असेल तर मग  याच्यात कोणता पर्याय निवडायचा हे देखील मी अधिकाऱ्यांना सांगितलं तशा प्रकारचा प्रस्ताव सादर करायला सांगितलं आहे.*

विधान भवनाच्या विस्ताराकरिता पुरवठा विभाग, वन विभाग, शासकीय मुद्रणालय त्याचप्रमाणे खाजगी जागांचे सुद्धा अधिग्रहण करण्यासाठीचे प्रस्ताव या बैठकीत चर्चा करण्यात आले असे शिंदे यांनी सांगितल.

---------------------------------------

गोंदिया ग्रामपंचायत

हवामान बदलाचे होणारे दुष्परिणाम रोखण्यासाठी ग्रामपंचायतीने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा ग्रामपंचायतीनं राष्ट्रीय पंचायत पुरस्कार २०२३-२४ अंतर्गत देशातून प्रथम पटकाविला असून १ कोटी पुरस्काराची मानकरी ठरली आहे. या पुरस्काराची घोषणा आज शासनाद्वारे करण्यात आली. तर राष्ट्रीय पंचायत पुरस्कार अंतर्गत कर्नाटक राज्यातील बिरडाहल्ली द्वितीय  आणि बिहार राज्यातील मोतीपूर ग्रामपंचायत तृतीय पुरस्काराची मानकरी ठरली आहे.

---------------------------------------

हवामान

नागपूरसह, चंद्रपूर, वर्धा, अमरावती, अकोला या जिल्ह्यांमध्ये उद्या आणि परवा उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 44 अंश आणि त्या पलीकडे पोहोचलं आहे. दरम्यान आज देखील अमरावती आणि अकोला तसेच चंद्रपूर जिल्ह्यात उष्णतेचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. आज सर्वाधिक कमाल तापमान चंद्रपूर इथं 44 पूर्णांक 6 अंश  तर त्या पाठोपाठ अमरावती इथं 44 पूर्णांक 4 अकोला

इथं 44 पूर्णांक 3 वर्धा आणि नागपूर इथं 44 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. बुलढाणा वगळता उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 41 ते 42 अंश सेल्सिअस दरम्यान आहे.

----------------------------------------

आयपीएल

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध गुजरात टायटन्स हा सामना कोलकाता इथ सायंकाळी साडेसात वाजता होणार आहे. काल एका सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघानं पंजाब किंग्स इलेव्हन संघाचा पराभव केला. तर मुंबईच्या वानखेडे मैदानावर झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सनं चेन्नई सुपर किंग्ज संघाचा ९ गडी राखून पराभव केला.

----------------------------------------